Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

Volume - XI, Issue - II,
April - June - 2022
MARATHI PART - II

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com



# AJANTA

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI PART - II

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.306 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# EDITORIAL BOARD


**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Vitthal Shivankar**
Principal,
Chatrapati Shivaji College (Autumous),
Satara.

**Dr. Avanish Patil**
Head, Department of History,
Shivaji University, Kolhapur.

**Prof. (Dr.) Dhanaji Masal**
Head, Department of History,
Chhatrapati Shivaji College,Satara

**Mr. Manohar Nikam**
Chatrapati Shivaji College (Autumous),
Satara.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | विटा शहरातील रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक योगदान<br>**डॉ. वैशाली दशरथ चोरगे** | १-९ |
| २ | सातारा शहराची शैक्षणिक पार्श्वभूमी<br>**प्रा. प्रतिभा कृष्णात घाटगे** | १०-१४ |
| ३ | भारतीय संस्कृती व कलामध्ये पश्चिम महाराष्ट्रात सांस्कृतिक आंदोलन एक वैशिष्ट्य<br>**प्रा. कविता विजय कुपवाडे** | १५-२६ |
| ४ | रघूजी भोसले यांच्या बंगाल स्वारीचे राजकीय परिणाम<br>**श्री. किरण गणपत कुंभार** | २७-३१ |
| ५ | महात्मा गांधीच्या हत्येनंतर उद्‌भवलेल्या दंगली शमविण्यात प्रतिसरकारमधील क्रांतिकारकांचा सहभाग<br>**प्रा. डॉ. निलकंठ कामण्णा लोखंडे** | ३२-३३ |
| ६ | कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरील चरित्रग्रंथ : एक चिकित्सा<br>**प्रा. निकम मनोहर सुभाष** | ३४-४७ |
| ७ | मराठेकालीन महाराष्ट्रातील सर्वसामान्य स्त्रिया<br>**पूनम रमेश भूयेकर** | ४८-५१ |
| ८ | अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे विकासातील योगदान : विशेष संदर्भ शिवाजीराव नागवडे<br>**प्रा. शिवाजी रावसाहेब नेटके** | ५२-५६ |
| ९ | श्रमिक मुक्ती दलाचे शेतकऱ्यासाठीचे लढे<br>**श्री. सुपने उत्तम बाबासो** | ५७-६२ |
| १० | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेप<br>**श्री. रामचंद्र भारत कवितके** | ६३-६९ |
| ११ | पश्चिम महाराष्ट्रातील विट उद्योगातील स्थित्यंतर - विशेष संदर्भ कोल्हापूर जिल्हा<br>**डॉ. रामचंद्र वसंत कुंभार** | ७०-७७ |
| १२ | सहकारी चळवळीचा विकास - एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. राणी श्रीरंग शिंदे**<br>**डॉ. राजश्री नितीन गायकवाड** | ७८-८३ |

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड यांचे सामाजिक कार्य<br>**प्रा. सदाशिव मोरे** | ८४-८७ |
| १४ | मराठा सरदार रायनाक महार एक कर्तबगार व दुर्लक्षित व्यक्तिमत्व<br>**डॉ. संतोष अभिमन्यू जेठीथोर** | ८८-९१ |
| १५ | आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील डॉ. पतंगराव कदम यांचे शैक्षणिक योगदान<br>**श्री. कोरडे संतोष मनोहर** | ९२-९७ |
| १६ | महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वीचे सातारा जिल्ह्यातील राजकारण<br>**श्री. सोमनाथ भानुदास जाधव** | ९८-१०२ |
| १७ | फलटण शहराच्या आर्थिक विकासातील नगरपरिषदेचे कार्य<br>**प्रा. अनिल शिवाजी टिके** | १०३-१०९ |
| १८ | स्त्री शिक्षणात सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान<br>**डॉ. वर्षा माने** | ११०-११४ |
| १९ | ब्रिटीशकालीन तंत्रशिक्षण : विशेष संदर्भ कोल्हापूर संस्थान (इ.स. १८८७ ते १९२२)<br>**डॉ. विकास मोहन सरनाईक** | ११५-११८ |
| २० | महाराष्ट्रातील सहकार चळवळ व दुग्धव्यवसायातील योगदानाचा अभ्यास<br>**प्रा. विकास भानुदास टकले** | ११९-१२२ |
| २१ | मराठी साहित्य आणि संस्कृती<br>**प्रा. डॉ. विष्णुपंत म. इंगवले** | १२३-१२७ |
| २२ | निश्चलनीकरणाच्या काळातील भारतीय सहकारी चळवळ : सिंहावलोकन<br>**डॉ. सौ. सविता अनिलकुमार वावरे**<br>**प्रा. नवनाथ नाथराव इप्पर** | १२८-१३९ |
| २३ | इंदिरा गांधींचा वीस कलमी कार्यक्रम आणि महाराष्ट्र<br>**डॉ. मंजुळकर अंबादास कल्लाप्पा** | १४०-१४४ |
| २४ | अंकलखोप गावातील सांस्कृतिक मंडळे व विकास<br>**श्री. पाटील अभय पांडूरंग** | १४५-१४९ |

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# ६. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरील चरित्रग्रंथ : एक चिकित्सा

**प्रा. निकम मनोहर सुभाष**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

प्रस्तावना

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर अनेक चरित्रग्रंथांची निर्मिती झाली साधारणतः ही संख्या पन्नासपेक्षा जास्त आहे. यातले बहुतांश ग्रंथ हे कर्मवीर विद्या प्रबोधिनी आणि आणि रयत शिक्षण संस्थेच्या वतीने प्रकाशित झालेली आहेत. वहिनी उर्फ कै. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्यावरील ग्रंथांचा मोठा भाग हा देखील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याच चरित्र प्रभावाने व्यापलेला दिसतो. आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था जिच्या शाखांची संख्या आज सातशेच्यावर गेलेली आहे. कर्मवीर यांच्या कार्याची उंची ही हिमालयाएवढ्या प्रचंड पर्वताशी करण्यात येते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या हाताला धरून अनेक मुलांनी संस्थेत प्रवेश केला आणि तेही कर्तुत्वाने मोठे झाले. कर्मवीर यांच्या कार्याने संस्थेच्या बाहेरील देखील बहुसंख्य जनता आणि विद्वजन प्रभावित झाले या सर्वांनी कर्मवीर कर्मवीर यांच्या त्यागाचा उत्तुंग वारसा पुढच्या पिढ्यांना मिळावा म्हणून वेळोवेळी त्यांचे चरित्र आपापल्या शैलीत रेखाटले. इतक्या मोठ्या संख्येने चरित्रलिखाण कर्मवीर यांच्यावर झाले असले तरी सर्वच चरित्र ग्रंथ हे सर्वोत्तम उंचीवर पोहचत नाही. कर्मवीर यांच्या अन्य पैलूंवर प्रकाश टाकण्याऐवजी केवळ त्यांच्यावरील चरित्र लिखाणाचा प्रकार आजही सुरूच आहे.

उद्देश

कर्मवीर यांच्यावरील चरित्र लिखाण हे मराठी,इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषांमध्ये झालेले आहे. काही चरित्र ही पद्यात देखील आहेत. चरित्र या प्रकारच्या सर्वोच्च शिखरावर पोहचलेले काही दुर्मिळ ग्रंथ देखील आहेत. या संशोधन पेपरसाठी पन्नासच्यावर चरित्र ग्रंथ उपलब्ध असली तरी केवळ या शोधनिबंधासाठी एकूण २४ कर्मवीर यांच्यावरील चरित्र ग्रंथाचा आढावा चिकित्सेसाठी आधार म्हणून घेण्यात आलेला आहे. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील यांच्याशी कर्मवीर अध्यासनात सदस्य म्हणून २०१३ ते २०१५ या कालावधीत चरित्र लिखाण करण्याच्या निमित्ताने झालेली चर्चा आणि त्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, कर्मवीर विद्याप्रबोधिनीचे कार्यकारी संचालक प्रिं.डॉ.आर.के.शिंदे यांच्याशीही याविषयावर वेळोवेळी चर्चा करण्यात आली ज्यामुळे या विषयाची व्याप्ती आणि आवाका लक्षात लक्षात येत गेला. डॉ. अनिल पाटील यांनी वेळोवेळी एक सर्वव्यापी कर्मवीर यांचे चरित्र नसल्याची खंत व्यक्त केलेली आहे. तोच धागा पकडून या शोध निबंधात देखील तटस्थपणा यानिमित्ताने आणण्याचा प्रयत्न प्रयत्न करण्यात आलेला आहे.

कर्मवीर यांचे सर्वात पहिले चरित्र लिहिले ते प्रबोधनकार ठाकरे यांनी यात त्यांची भाषा स्पष्ट आणि घटनांना बोलकी करणारी प्रसंगी जाब विचारणारी आहे. येथून पुढे लिहिलेले काही चरित्रग्रंथ यांची चिकित्सा करणे हा मूळ उद्देश आहे.

गृहीतके

१. कर्मवीर यांच्या कार्याने आणि व्यक्तिमत्वाने प्रभावित होऊन मोठ्या प्रमाणात चरित्र ग्रंथांची निर्मिती झाली.
२. सर्वच कर्मवीर यांच्यावरील चरित्रग्रंथ साहित्यिक उंची गाठत नाही.
३. प्राथमिक आणि दुय्यम अशी ऐतिहासिक साधने असताना उत्तम असा वस्तुनिष्ठ इतिहास ग्रंथ कर्मवीर यांच्यावर अद्याप लिहिण्यात आलेला नाही.

संशोधन पद्धती

ऐतिहासिक विश्लेषण पद्धती आणि तुलनात्मक पद्धती या संशोधन पेपरसाठी वापरण्यात आलेली आहे.

मर्यादा

कर्मवीर यांच्यावरील चरित्र ग्रंथांची संख्या पन्नास पेक्षा जास्त असली तरी केवळ निवडक २४ ग्रंथांचाच आढावा विस्तार मर्यादेमुळे घेण्यात आलेला आहे.

विश्लेषण

कर्मवीर भाऊराव पाटील लेखक डॉ.मॅथ्यू ए.व्ही. (मराठी अनुवाद वाळिंबे वि.स.)

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आजपर्यंत लिहिण्यात आलेल्या चरित्र लिखाणात सर्वात वरचे स्थान या कृतीला आहे. हे चरित्र सर्वात पहिले व्यापक असे कर्मवीर यांचे चरित्र मानले जाते. याचे मूळ लिखाण हे एप्रिल महिन्यात सन १९५६ साली म्हणजे कर्मवीर यांच्या हयातीतच लिहून पूर्ण झाले. पुस्तकाचे मूळ लेखक डॉ.मॅथ्यू ए.व्ही. रयत शिक्षण संस्थेत साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून १९५० ते १९५४ काम करीत होते.सातारा येथील संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य म्हणून डॉ. ए. व्ही. मॅथ्यू हे १९५० ते १९५४ पर्यंत काम करीत. होते. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांतील कर्मवीर अण्णांचे कार्य पाहून ते अत्यंत प्रभावित झाले आणि त्यांनी कर्मवीर अण्णांचे चरित्र लिहिण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा संस्थेने हे काम त्यांच्यावर सोपविले.त्यांनी त्या वेळी अण्णांचे समकालीन जे सेवक, कार्यकर्ते होते त्यांच्या व अण्णांच्या काही नातेवाइकांच्या मुलाखती घेतल्या. तसेच संस्थेचे रेकॉर्ड पाहून हे चरित्र त्यांनी लिहून काढले. या चरित्राचा भाग जसजसा लिहून पुरा होईल तसतसा तो त्यांनी अण्णांना वाचून दाखविला आणि नंतरच या ग्रंथाचे छपाईचे काम झाले आहे. यामुळे या ग्रंथातील लिखाण वस्तुस्थितीवर आधारले आहे .प्राथमिक साधनांचा यात उत्कृष्टपणे वापर करण्यात आल्याने हा ग्रंथ दर्जेदार दर्जेदार अशा इतिहास ग्रंथासारखा झाला आहे.[१]

कर्मविरोपनिषद अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी लेखक बॅ पाटील पी.जी.

लेखक हे इयत्ता सहावीत असल्यापासून कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था यांच्याशी संपर्कात असल्याने, जवळून परिचित असल्याने याबरोबर कर्मवीर यांच्या निधनानंतर देखील त्यांनी प्रदीर्घ सेवा ही रयत संस्थेतील विविध महाविद्यालयांमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक आणि प्राचार्य म्हणून केल्याने आणि लेखक हे इंग्रजी भाषेतील एक मान्यवर तज्ञ असल्याने त्यांच्या मांडणीला विशेष असे महत्व आहे.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यामृत्युनंतर केवळ ५ वर्षांनीहे पुस्तक प्रकाशित झाले आहे. लेखकाने पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने आपले मनोगत हृदगतनावाने व्यक्त केले आहे जे या पुस्तक लिखाणाचा उद्देश आणि कर्मवीर यांच्या प्रती त्यांच्या मनात असलेले अफाट प्रेम व्यक्त करणारे आहे. जवळजवळ २० वर्ष एवढ्या प्रदीर्घ काळ ते कर्मवीर यांच्या सहवासात होते. शेवटच्या सात वर्ष त्यांचा अण्णांशी फार घनिष्ठ संबध आला. लेखकाच्या मते, खुद्द आण्णांच्या तोंडून आणि अन्य लोकांच्याकडून त्यांनी आठवणी जोडल्या आहेत. त्यांना घटनांच्या सत्यतेबद्दल खात्री वाटते. त्यांनी कर्मवीरांच्या छोट्या छोट्या आठवणी संकलित केल्या आहेत. लेखकबॅ पी.जी. पाटील यांच्या मते, कर्मवीर यांच्या विविधांगी व्यक्तिमत्वाच्या काही पैलूंचे दर्शन, महाराष्ट्रातील जनतेस घडवावे, या हेतूने त्यांनी संकलित केल्या आहे.[२]

- भाग एक - पुरस्कार, हृदगत महर्षी कर्मवीर भाऊराव : एक चिंतन,
- भाग २ - आठवणी,
- भाग ३ - श्रद्धांजली व स्फुट लेख,
- भाग ४ - भावांजली अशा चार भागात पुस्तकाची विभागणी करण्यात आली आहे.

धनंजयराव गाडगीळ यांच्याच शब्दात "पहिल्या भागात भाऊराव यांच्यावरील मृत्युलेख व तत्सम साहित्याचा आहे. शाश्वत मूल्य यात कमी असली तरी विविध प्रकृतीच्या व्यक्तींच्या तात्कालिक प्रतिक्रिया या दृष्टीने त्यास महत्व आहे. दुसरा भाग हा आठवणींचा आहे.ज्या रयत शिक्षण संस्थेच्या छायेत वाढलेल्या व त्यात काम करीत असलेल्या व्यक्तींच्या आहेत. त्यातील अनेक भाऊरावांकडून त्यांनी ऐकलेल्या स्वरूपात नोंदल्या गेल्या आहेत" अशा प्रकारे पहिल्या दोन भागाला ध.रा. गाडगीळयांच्या १९६४ साली पुस्तकाबद्दल जी प्रतिक्रिया दिली गेली होती त्यावरून पूर्ण पुस्तकाचा अनुभव येत नाही. कारण पुस्तक हे यापेक्षा वेगळा अनुभव आणि माहिती आपल्याला प्रत्यक्ष वाचताना देत. अन्य पुस्तकांमध्ये सुटलेल्या बऱ्याच दुर्मिळ बाबी आणि प्राथमिक इतिहासाचे साधन म्हणता येईल अशा स्वभावास उलगडणाऱ्या बाबी आणि घटना यातून पुढे येतात.[३]

ज्ञानगंगा, लेखक जमादार यू.बी.

भाषा ही पूर्णपणे हिंदी आहे. या पुस्तक लिखाणाचा उद्देश नमूद करतात ज्यात त्यांच्या मते, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर जेवढे साहित्य निर्माण व्हायला हवे होते तेवढे निर्माण झाले नाही. त्यांच्या जीवन आणि कार्याची माहिती सामान्य लोकांना होणे आवश्यक आहे. पुस्तकाची लेखनशैली ही अतिशय वेग धारण करते यामुळे एखादा चित्रपट पाहत असल्याचा आभास आपल्याला होतो. एकूण ४८

शीर्षकाखाली हे पुस्तक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकते. आपण काही शिर्षक बघितली तर आपल्याला त्या शीर्षकावरून आत घटना कोणत्या येणार याचा अंदाज बांधता येतो. या पुस्तकाचे विशेष असे की पुस्तकातील संवाद, काव्य आणि कर्मवीर यांच्या संबधी विद्वान लोकांची मते ही आपल्याला खिळवून ठेवतात. ऐतिहासिक दृष्टीने पाहिले आपल्याला चिकित्सा अथवा मूल्यमापन आढळणार आढळणार नाही परंतु कर्मवीर भाऊराव पाटील यांचा घटनाक्रम कमी काळात बघण्याची गती या पुस्तकाने साध्य केली आहे. [४]

कर्मवीर भाऊराव पाटील लेखक प्रा.मोरे अरविंद प्रतापराव

लेखक अरविंद मोरे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या पंढरपूर आणि विटा येथे हिंदी विषयाचे प्राध्यापक म्हणून सेवा केलेली आहे. पुस्तक लिहिण्याचा उद्देश सर्वसामान्य, हिन्दी भाषिक आणि शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महान अशा शिक्षण महर्षींचे कार्याचा परिचय व्हावे हा आहे. एकूण एकूण १२ प्रकरणात या पुस्तकाचे विभाजन करण्यात आलेले आहे. पुस्तकाचे लिखाण हे हिंदी भाषेत करण्यात आले आहे. पुस्तकात येणारे प्रसंग आणि उदाहरणे ही अतिशय मार्मिक आणि महत्वपूर्ण अशी आहेत. प्रसंगानुसार हिंदी आणि इंग्रजी सूक्तेयांचा वापर करून पुस्तकाचे लिखाण जिवंत करण्यात आलेले आहे. काही ठिकाणी अगदी मोजक्या शब्दात घटना मांडल्यामुळे कधी कधी आटोपशीरपणा येतो तर कधी कधी कवींचे दोन दोन काव्य ओळी घातल्याने त्यात रसभरीतपणा वाढतो.[५]

अग्निदिव्य लेखक मोरे मारुती रामचंद्र

सदर पुस्तक म्हणजेकर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनावर आधारित अशी नाट्यकलाकृती म्हणजे जिवंत भूमिका आणि संवाद यावर नाटक आहे. यातली भाषा आणि संवाद यांची निवड लक्षात घेतली तर कुठेही मूळ चरित्र आणि घटना यांना धक्का न लागू न देता लेखकाने केलेली उत्कृष्ठ अशी कलाकृती जाणवते. [६]

पद्मभूषण (गीत-कर्मवीर) हिंदी खंडकाव्य, लेखक सनदेसा.बा. “राही”

मैथिली शरण या हिंदी महान कवीपासून प्रेरणा घेऊन त्यांनी पहिले खंडकाव्य कर्मवीर आधारित अशा "पद्मभूषण"" नावाने लिहिले. एकूण ६३ पानात लिहिलेले हे लहान आकाराचे हे पुस्तक आहे. हिंदी भाषेत आणि काव्यमय स्वरुपात लिहिलेले खंडकाव्य अतिशय मार्मिक आणि सोन्द्र्यप्रधान असे झाले आहे. यमक यांना जोडताना घटना तेवढ्याच ताकदीने त्यांनी मांडल्या आहेत. वाचताना कुठलीही अडचण सामान्य वाचकांना येणार नाही इतकी साधी आणि ओघवती भाषा पुस्तकाला वापरली आहे.[७]

आधारवड कर्मवीर भाऊराव पाटील गौरवग्रंथ संपादक :- प्रा.नाईकवाडे अशोक

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हा ग्रंथ प्रकाशित झाला होता. कर्मवीर यांच्यावरचा एक महत्वपूर्ण असा हा ग्रंथ म्हणावा लागेल. कारण महाराष्ट्रातील विवध विद्वान, लेखकआणिविविध क्षेत्रातील प्रतिष्ठित अशामान्यवरांचेकर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरील एकूण २५ लेख यांत प्रा. अशोक नाईकवाडे यांनी संपादित केलेले आहेत. विविध मान्यवर लेखकांनी त्यांना समजलेले

आणि भावलेले असे कर्मवीर आपल्या लिखानामधून चित्रित केले आहेत. केवळ एकांगी असा दृष्टीकोन किंवा आंधळी भक्ती त्यात आलेली नाही तर यात त्यांनी चिकित्सा देखील केलेली आहे. या पुस्तकाचे महत्व हे ऐतिहासिक दृष्ट्या फार मोठे आहे. कारण यात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा यात इतिहास बघायला तर मिळतोच त्याबरोबर प्रत्येक स्वतंत्र लेखक हा कशा पद्धतीने कर्मवीर यांचे जीवन चरित्र मुल्यामापित करतो याचा आपल्याला या निमित्ताने अनुभव घेता येतो. प्रत्येक लेख हा स्वतंत्र पुस्तक होऊ होऊ शकेल इतका महत्त्वपूर्ण आहे.[८]

कुमारांचे कर्मवीर लेखक डॉ.भोसले द.ता.

रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणी मार्फत कर्मवीर यांचे चरित्र लिहिण्याचा जो निर्णय घेण्यात आला त्याची जबाबदारी डॉ.भोसले यांना देण्यात आली. बालवयातच विद्यार्थ्यांच्या ठायी श्रमप्रतिष्ठा, देशप्रेम देशप्रेम व मानवता यांची बीजे रुजावीत याच एका भूमिकेतून सदर चरित्र लिहिल्याचे लेखकाने मनोगतात व्यक्त केले आहे. ग्रंथाचे विभाजन कुठल्याही प्रकारे प्रकरणे करून त्यांना नावे देऊन करण्यात आलेले नाही नाही तर एकूण एकूण ४१ भागात हे पुस्तक लिहिण्यात आलेले आहे. डॉ.द.ता.भोसले यांची विद्वता पूर्वसिद्ध पूर्वसिद्ध असल्याने त्यांनी ह्या पुस्तकाची भाषा अतिशय धारधार आणि ओघवती पुस्तकाला शीर्षकाला साजेशी अशी ठेवली आहे.घटना त्यांनी अशा पद्धतीने मांडल्या आहेत की त्या सरळ हृदयाला जाऊन भिडतात, यामुळे पुस्तक केवळ कुमारांचेच नाही तर वयस्क यांच्या देखील फायद्याचे आहे. पुस्तकात जे मध्ये मध्ये चित्रप्रसंग टाकले आहेत ते एक वेगळा रंगतदारपणा आणि जिवंतपणा घटनांना आणतात[९]

त्यागमूर्ती कर्मवीर भाऊराव लेखक संभाजीराव पाटणे

कर्मवीर यांचा थोडक्यात परिचय सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांना करून द्यावा या स्तुत्य स्तुत्य हेतूने महाराष्ट्रातील विद्वान संभाजीराव पाटणे यांनी केले आहे. भाषा ही अतिशय ओघवती असल्याने असल्याने पुस्तक लवकरच लोकप्रिय झालेले दिसते. [१०]शिक्षणमहर्षी कर्मवीर-गाथा (कथासंग्रह) लेखक प्रा. मोरे अरविंद

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनावर आधारित असणारा हा कथासंग्रह लेखकाने लिहिलेला आहे. अतिशय छोटा केवळ ५६ पानांचा तेवढ्याच लहान आकाराचा हा संग्रह आहे.बंडखोर भाऊ, रामशास्त्रीबाणा, निर्धार, गंगोत्री, माणुसकी, पांडुरंग सेवा, आदेश, हिमंत, शिवप्रेम, मंगळसूत्रयाकथांद्वारे कर्मवीर यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडण्यात आले आहेत. या कथांमध्ये आपल्याला नेहमीच्या कथांचा बाज अथवा आनंद लाभणार नाही कारण या कथा कर्मवीर यांच्या क्रमाने चरित्र घटना पुढे आणतात. कर्मवीर यांच्या आयुष्यातील घटनाक्रम ज्यांना माहिती आहे त्यांना केवळ हे चरित्र लिखाणच वाटण्याची शक्यता जास्त आहे. कारण कथेचे गुणविशेष यात आढळत नाही. जरी पहिल्यांदा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर कथालेखन करण्याचा दावा केला असला तरी वळण मात्र चरित्रग्रंथाचे घेतलेले आपल्याला जाणवते. भावना बाजूला ठेऊन आपल्याला कथालेखनफसून चरित्रलेखन झाल्याचे प्रामाणिकपणे म्हणावे लागते.[११]

ज्ञानभगीरथ कर्मवीर-वाणी लेखक प्रा. मोरे अरविंद

कर्मवीर भाऊराव पाटील यांनीपत्रांच्या माध्यमातून, प्रसंगांच्या माध्यमातून जे वाक्य उच्चारले, विचार व्यक्त केले त्यांचे एकत्र संकलन आणि संपादन हे पुस्तक हे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अन्य चरित्र ग्रंथांसारखे नाही पण त्यांचा आधार आणि संदर्भ घेऊन मात्र लिहिण्यात आलेले दिसून येते. कर्मवीर कोठे आणि का बोलले ? याचा उल्लेख केलेला नसला तरी वाक्य आणि विचार या द्वारे कर्मवीर यांच्या व्यक्तिमत्वाचा एक अंदाज या पुस्तकातून बांधता येतो. त्यांच्या विचारात आणि कार्यात सुविचार यांची एक मोठी ताकद होती हे जाणवते.[१२]

कर्मवीर पाटील चरित्र व कार्य लेखक तोडरमल ह.कि.

पुस्तक लिहिण्यासाठी लेखकाने रयत संस्थेमधून अनेक संदर्भ ग्रंथ आणि कागदपत्री मिळवली आणि याबरोबर प्राथमिक साधन ठरू शकणाऱ्या कर्मवीर यांचा सहवास लाभलेल्या रयत सेवकांच्या मुलखाती घेतल्या आहेत. पुस्तक हे एकूण २३ सुटसुटीत अशा प्रकरणांमध्ये विभागले आहे. ज्यात पूर्वज, बालपण, शिक्षण, पुढे काय ?, भाऊ मास्तर, डांबर प्रकरण, नोकरी, कूपर कारखान्याची उभारणी, सत्यशोधक समाजाचे पुढारी, रयत शिक्षण संस्थेची स्थापना, नांगऱ्या पाटलाची कुऱ्हाड, शाहू बोर्डिंग आणि अन्य. या प्रकरणांच्या माध्यमातून विषय उलगडत क्रमाने पुढे नेण्यात आला आहे. लेखकाची निवेदन शैली ही मराठी साहित्यिकाला शोभणारी असल्याने आणि प्रत्येक घटनेच्या सोबत विशेष अन्य प्रादेशिक आणि ऐतिहासिक माहिती दिल्याने हे पुस्तक रोचक झाले आहे. सुरवातीपासून हे पुस्तक वाचकाची एक घट्ट पकड घेते. घटनांचा ऐतिहासिक क्रम हा तंतोतंत आणि भौगोलिक जवळीक न सोडणारा असल्याने पुस्तक वैशिट्यपूर्ण आणि वेगळे ठरते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मृत्युच्या क्षणापर्यंतचे घटनाक्रम पुस्तक आपल्यापुढे मांडते.[१३]

भावसुमनांजली लेखक खोले वसुंधरा

कर्मवीर यांना परमेश्वरस्वरूप मानणाऱ्या वसुंधरा खोले या कवयत्रीने आपल्याला मनातील उत्कट भावनांना आणि विचारांना काव्यमय रूप दिले आहे.फुलांच्या सुवासाप्रमाणे त्या कर्मवीर आणि वाहिनी लक्ष्मीबाई यांच्या आठवणीना मानतात.बॅं.पी.जी.पाटील यांचा मोठा प्रभाव आपल्या काव्य लिखाणावर पडलेला त्या मानतात. त्यांच्या काव्यातून कर्मवीर यांचे चरित्र पुन्हा एकदा जिवंत होताना दिसते. या काव्यात प्रतिभा देखील आहे. जसे भाऊराव आला जन्माला हे काव्य

सरस्वती मनी होती चिंतीत
अबोल होऊन वीणा निपचीत
कुशल पुसावे म्हणून ब्रम्हा प्रगत झाले
संचित का तू ? कन्येप्रतविचारते झाले
किंवारयत माउली ह्या कवितेतील शब्दांची खास निवड असेल
सूर्य रेखला भालावरती

अशी मिळवली कीर्ती
रयतेची माउली बनुनी
दिली सावली, स्फूर्ती

सदर पुस्तकातून इतिहास किंवा पूर्ण चरित्राची अपेक्षा न करता केवळ शुद्ध कर्मवीर यांच्यावरचे एक उत्कृष्ठ काव्य या नजरेने बघितले तरच वाचकाचे समाधान होऊ शकते.[१४]

प्रबोधनाची धगधगती मशाल कर्मवीर भाऊराव पाटील काटकर मा.भि.

श्री.मा.भि.काटकर हे रयत शिक्षण संस्थेत विविध पदांवर कार्य करून १९८३ साली सेवानिवृत्त झाले. झाले. याबरोबर यानंतरदेखील १९८७ साली संस्थेत त्यांनी जबाबदारी स्वीकारली आहे. सन १९४८ ते १९५९ ते कर्मवीर यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम करीत होते. लेखकाला पहिल्यांदा कर्मवीर यांना पाहण्याचा योग आला तो स्वताच्या गावात वडगाव हवेली (ता. कराड) येथे. त्यांनी यात अण्णा यांची गरीब आणि निरक्षर लोकांशी संवाद साधण्याची त्यांच्या हृदयात शिरून जिंकण्याची ग्रामीण शैली वर्णन केली आहे. संस्था रजिस्टर्डनाही, पत्नीचे सर्व दागिने संपले होते. शासन अनुदान नव्हते. अशा काळात वसतिगृहात एकूण दीडशे विद्यार्थी होते. अशा बिकट स्थितीत हा मानव प्रबोधनाची मशाल घेऊन एकेक गाव साक्षर करीत चालला आणि नंतर महाराष्ट्राचा शिल्पकार झाला. हे लेखकांच शब्द कर्मवीर यांची नेमकेपणाने दखल घेतात. या पुस्तकाच्या नंतरच्या आवृत्तीस विश्वकोशकार लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेली प्रस्तावना प्रस्तावना तेवढीच महत्वपूर्ण आहे. त्यांच्या मते, कर्मवीर यांचे कार्य अन्य महाराष्ट्रात पसरणे आवश्यक आहे. आणि या प्रबोधनाच्या कार्याला काटकर यांनी भाऊराव पाटील यांचे चरित्र लिहून विशेष वेग दिला आहे[१५]

कर्मवीरगाथा लेखक पाटील भगवान

लेखकाने रयत शिक्षण संस्थेतील विविध महाविद्यालयांमधून मराठीचे प्राध्यापक म्हणून सेवा केलेली आहे. कर्मवीर यांचे चरित्र त्यांनी ओवीरूप स्वरुपात लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकूण चौदा अध्यायात या कर्मवीर यांच्या चरित्र ग्रंथाचे लेखन करण्यात आलेले आहे. यातले अध्याय असे – भाऊराव पाटील यांच्या घराण्याचा इतिहास, भाऊरावांचे बालपण,राजर्षी शाहूंचीभाऊरावांस प्रेरणा, भाऊरावांचे शिक्षण, लग्नसोहळा आणि अन्य. पुस्तकाची जमेची बाजू म्हणजे कर्मवीर यांचे मानसपुत्र बॅ पाटील पी.जी.

यांची प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. त्यांच्या प्रस्तावनेत ओव्यांची संख्या एकूण १७०० असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. कर्मवीर यांची काव्यमय सेवा केल्याबद्दल त्यांनी भगवान पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

खालील काही अध्यायातील ओव्यांवरून आपल्याला लक्षात येईल की, लेखकाने त्या लिहिण्यासाठी मोठी मेहनत केली असावी. घटना ओव्यात लिहिताना काव्यात्मक शोभा जाण्याची भीती असे कुठेही आपल्याला दिसत नाही याउलटमराठीसंतांचा अभंगांचा गोडवा लेखकाने आपल्या काव्यात आणला आहे.

**अध्याय पहिला : भाऊराव यांच्या घराण्याचा इतिहास**

**ॐ नमः श्रीगणेशा। मांगल्याची आशा ।**
**वर दे परमेशा । कार्यसिद्धीस**
**तू सुखाचा कर्ता । कृपादृष्टो दुःखहर्ता**
**विघ्नेही निवारता । क्षणोक्षणी**
**शिरी सुवर्ण मुकुट । दिसे शोभूनी किरीट**
**प्रभातेज घनदाट । विखुरले**
**अध्याय दुसरा : भाऊरावांचे बालपण**
**वंदन श्रोतुजन हो । नित्य अवधान द्या हो**
**आता श्रवण करा हो । कथाभाग पुढील**
**काय रसिका वाणू महिमा । न जाता ही तीर्थधामा**
**पुनीत तयाचे परिणामा। संतोष लाभे**
**येई बहार रुचित्वामुळे । फुलून येती सारस्वतमळे**
**ज्ञानामृत चाखाया मिळे । धन्य अंतरी**
**न व्हावे उदास मनी । चित्त एकाग्र करूनी**
**अध्याय तिसरा : राजर्षी शाहूंची भाऊरावांस प्रेरणा**
**कथाभाग आता पुढील । चित्त प्रसन्न होईल**
**बोल माझे हे लडिवाळ । गोड मानिजे**
**वेडावाकुडा शब्द चुकता । रोष न धरावा आता**
**ऐकता तव आपुले चित्ता । वृद्धी होईजेल**

कर्मवीर यांच्या चारीत्रासोबत रयत शिक्षण संस्थेचे पुण्याचे कार्य हे देखील आपल्या सुंदर ओव्यातून आणि सोप्या शब्दातून भगवान पाटील हे मांडत असल्याने काव्याच्या साहित्यिक उंचीबरोबर हा ग्रंथ वाचकाची मनाची पकड घेतो.[१६]

वटवृक्ष प्रा.डॉ. पाटील विमला, प्रा.डॉ. पाटील शिवाजी

लेखिका विमला पाटील आणि शिवाजी पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेतील विविध महाविद्यालयात महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सेवा केली आहे. म्हणून दोन्हीही लेखकांची एक नाळ रयत संस्थेच्या पवित्र भूमीशी आणि आण्णांच्या कर्माशी जोडलेली आहे. पुस्तकाचे स्वरूप अखंड चरित्रग्रंथाचे नाही तर शोधनिबंध या स्वरुपात वेगवेगळ्याविषयांवर लेख लिहिण्यात आले आहेत. म्हणून चरित्रग्रंथात येणारी वारंवारता यात जाणवत नाही.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवन आणि तत्वज्ञान, सौ.लक्ष्मीबाई यांचे त्यागमय जीवन, स्त्री-शिक्षणाबद्दल कर्मवीर यांचा दृष्टीकोन आणि कार्य, दैव आणि देवविरहीत कर्मवीरांनी कार्यातून प्राप्त केलेले संतत्व, कार्यातून मांडलेले लोकनेतेत्व, कर्मवीर भाऊराव यांचे शिक्षण आणि त्यासंबधी कार्यांविषयी विचार

आणि त्यांच्या आठवणी या पुस्तकातून आपल्याला पाहण्यास मिळतात. यामुळे काही वेगळे पैलू आणि माहिती आपल्याला या पुस्तकातून मिळते.[१७]

माणसातील देव लेखक अजित पाटील

अजितपाटील हे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू आहेत. लेखकाने सुरवातीला पुस्तकाचे स्वरूप काय हे स्पष्ट करताना सांगितले आहे की, ही कादंबरी ,चरित्र किंवा व्यक्तिरेखाही नाहीत तर आठवणी आहेत अण्णांचं संपर्कात येऊन ज्यांच्या जीवनाचे सोने झाले आहे त्यांच्या.संपूर्णपुस्तक हे एकूण १९ प्रकरणामध्ये शिर्षकांशिवाय विभागलेले आहे. यात अजित पाटील यांनी लहान असताना कर्मवीर अण्णा आणि अन्य लोकांसोबत असणारे त्यांचे संबंध, विविध मान्यवरांच्या भेटी, त्यांच्याशी झालेल्या चर्चा अतिशय विस्तृतपणे समोरच त्या घटना घडत असल्याच्या आभास निर्माण करणाऱ्या शैलीत मांडले आहे. यात सुनिता देशपांडे, माजीमुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, आणि अन्य क्षेत्रातील मोठे मान्यवर यांच्याशी झालेल्या भेटी, पत्रव्यवहार आणि चर्चा यात आल्या आहेत. यात काही महत्त्वाचे प्रसंग देखील येतात जसे आण्णांची दिनचर्या, त्यांचा आहार आणित्यांची स्वतःच्या नातेसंबंध याबाबत रयत संस्थेत कोणतेही मोठे पद न घेण्याची त्यागी भूमिका, देवआणि धर्माबाबत त्यांचे विचार आणि अन्य बाबी या पुस्तकालामहत्वपूर्ण बनवतात. सदर ग्रंथ नियमित कर्मवीर यांच्या चरित्र ग्रंथासारखा जन्मापासून ते मृत्यूपर्यंत घटनाक्रम देणारा नाही. अजित पाटील यांनी मांडलेल्या घटना ह्या प्रत्यक्ष पाहिलेलेल्या आणि अनुभवलेल्या असल्याने एक उत्कृष्ठ असा स्मृतीग्रंथ एक इतिहासाचे साधन म्हणून हा ग्रंथ होऊ शकतो.[१८]

कर्मवीर गीतमाला काव्यरचना –श्री मेरेकर अविनाश कृष्णराव

या पुस्तकाचे नावावरून आपल्याला जाणवते की, कर्मवीर यांच्यावरील कविता आणि गीते यांचा समावेश यात असणार. अतिशय छोटेखानी असलेले हे पुस्तक आहे. मुळच्या विदर्भातील असलेल्या लेखकांनी रयत शिक्षण काही काळ शिक्षण घेण्याबरोबर विविध महाविद्यालयांमधून नोकरी देखील केलेली आहे. लिखाणाचे पूर्ण श्रेय लेखक हे कर्मवीर यांच्या कार्याला देतात. यात एकूण २४ काव्य आणि गीते लिहिण्यात आली आहेत. जय कर्मवीर बोला, कर्मवीरा, तूच आमचा भगवान, कर्मवीर वंदन, ज्ञानाचा सागर, परमेश्वर, कर्मवीर,तुम्ही किती महान, आण्णांनी काय केले ? या आणि अन्य शिर्षकाखाली काव्य आणि गीते लिहिण्यात आली आहेत. यात काही कविता या सध्या धाटणीच्या तर काही उत्तम शब्दांनी गुंफलेल्या आहेत. तर क्रमांक २२ ची श्री.कर्मवीर चरित्र नावाची ओवीबद्द रचना आहे. ज्यात काही थोड्या पानातच काव्यमय कर्मवीर चरित्र मांडण्यात आलेले आहे.

काव्यात्मक आणि गीतांची फार मोठी उंची ग्रंथ गाठत नसला तरी गीतांचे आणि काव्याचे बोल नेमकेपणाने कर्मवीर चित्रित करतात.

आण्णांचे आभाळाएवढे मन
स्वतः दुःख सोसून
दुसऱ्याचे दुःखाश्रूपुसून अज्ञानात बुडत असता जन

ज्ञानमार्गाचारस्ता दाखवून
साजरा केला गोरगरिबांचा दिवाळी सण|| १ ||

अशा अन्य कविता देखील प्रसंग बोलका करताना दिसतात चरित्र उभा करताना दिसतात. [१९]

महान शिक्षविद्कर्मवीर भाऊराव पाटील (जीवनगाथा) लेखक प्रा.डॉ.जाधव मोहन

लेखक यांनी रयत शिक्षण संस्थेतील विविध महाविद्यालयात सेवा केलेली आहे. पुस्तक प्रकाशित करताना ते सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे कार्यरत होते. सदर ग्रंथ हा हिंदी या भाषेत लिहिण्यात आलेला आहे. सदर पुस्तकात कर्मवीर यांच्या जीवन आणि कार्य याच्यावर थोडक्यात प्रकाश टाकण्यात आलेला आहे. प्रकरणांची अनुक्रमणिका न देता लहान लहान विभाग करून त्यांना शिर्षक देण्यात आलेली आहेत. जसे बचपन से विद्रोही, कोल्हापूर के छात्रावास से निष्कासित, पढाई मे कमजोर, रोजी रोटी की तलाश, जीवन का परिवर्तन का बिंदू, भाऊराव बने पाटील मास्तर आणि अन्य. सदर पुस्तक हे वेगात वाचून होणारे असे छोटेसे कर्मवीर चरित्र आहे. यात नेहमीच्या प्रसिध्द घटना ह्या क्रमाने दिल्या आहेत ज्या अन्य पुस्तकात आधीच आलेल्या आहेत. लेखकाचा उद्देश कदाचित हिंदी भाषिकांना कर्मवीर चरित्र माहिती होण्याचा आणि उपलब्ध करून देण्याचा दिसतो. हिंदी भाषेत केलेले लिखाण हेच काय त्याचे वेगळेपण होऊ शकते. शेवटी सुप्रसिद्ध लोकांनी कर्मवीर यांच्या व्यक्त केलेली भावना आणि मते मते आली आहेत.[२०]

द्रष्टा महात्मा भाऊराव पाटील लेखक प्रा.मगदूम विष्णुदास एच.

लेखक यांनी महाविद्यालयीन शिक्षण हे रयत संस्थेच्या सातारा येथील छ.शिवाजी कॉलेज येथे तर काही काळ रयत संस्थेच्या काही शाखांमध्ये इंग्रजी आणि संस्कृत विषयाचे शिक्षक म्हणून सेवा बजावली आहे. हे पुस्तक एकूण ४३ एवढ्या लहान लहान अशा प्रकरणात विभागलेले आहे. जसे भाऊराव पाटीलांची वंशावळ, कर्मवीरांचे यांचे बालपण, कर्मवीरांचे विद्यार्थी जीवन, विद्यार्थी जीवनातील काही आठवणी, वारणेचा वारणेचा वाघ सत्याप्पा, राजश्री शाहू आणि कर्मवीर, भाऊराव आणि मेजर महाडिक, भाऊराव आणि किर्लोस्करांचा लोखंडी कारखाना आणि अन्य. पुस्तकातील लिखाण हे क्रमवार प्रकरणे लिहून लेखकांनी केला आहे. परंतु त्यास एक ओघवतापणा न येता विस्कळीतपणाच आलेला दिसतो. पुस्तकाच्या सुरवातीला कर्मवीर आणि इतरांचे फोटो टाकून एक वातावरण निर्मितीकरण्यात आली आहे.काही प्रसंग, घटनाह्या नवीन असल्याने त्यात काही नवीन संदर्भ आपल्याला मिळतात. ही या पुस्तकाची जमेची बाजू म्हणावी लागेल. [२१]

संस्कारक्षम चरित्र मालिका कर्मवीर भाऊराव पाटील लेखक श्री.पाटोळे अरविंद

पुस्तकाच्या नावावरूनच ध्यानात येईल की, हे पुस्तक शालेय विद्यार्थ्यांसाठी लिहिलेले आहे. मूल्यशिक्षणाचे मोठे काम कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ओघवत्या चरित्राद्वारे व्हावा हा उद्देश याच्या लिखाणामागे दिसतो. केवळ ३२ पानांचे छोटेसे पुस्तक हे एकूण २१ लहानलहान प्रकरणात विभागले गेले आहे.भाऊरावांचे थोरपण ,आधुनिक भगीरथ पाटील मूळचे देसाई ,वंशवेल बालपणीचे संस्कार , बालपण व

शिक्षण छत्रपतींनी हेरले, सत्यप्पाने मार्ग दाखविला , अस्पृश्यतांबद्दल कळवळा , वसतिगृहातील बंडखोरी , भाऊरावांचा सत्यबाणा , नोकरी करायची नाही ,बीज अंकुरले ! संस्थेचा पाया घातला ,मुष्टी योजना ,स्वावलंबी शिक्षण ,स्मारके ,मुलांवरची माया ,संत गाडगेबाबांकडून गौरव , भाऊराव व ठक्कर बाप्पा , म. गांधींकडून गौरव यासारख्या सुटसुटीत प्रकरणांचा यात समावेश करण्यात आला आहे.[२२]

रयत शिक्षण संस्थेतील प्रारंभीचे शिलेदार रयत शिलेदार प्राचार्य डॉ.नलावडे विजयराव

पुस्तकाचेलेखक डॉ.विजय नलावडे यांनी रयत शिक्षण संस्थेत एकूण ३७ वर्ष नोकरी केली आहे. त्यांच्या मते त्यांच्या आयुष्यची प्रेरणा ही कर्मवीर यांचे जीवन आणि चरित्र राहिलेले आहे. सुरवातीच्या काळात कर्मवीर यांना अनेक निष्ठावान अशा शिलेदारांनी संस्था उभारणीत आणि तिच्या वाटचालीत मोठी साथ दिली आहे. त्यांच्या मते असे शेकडो व्यक्ती आहेत की ज्यांचे रयत संस्थेच्या उभारणीत मोठे योगदान राहिले आहे. सर्वांची माहिती देणे शक्य नसले तरी त्यांच्या मते त्यांनी मांडलेल्या व्यक्तींचा देखील देखील नवीन पिढीतील लोकांना परिचय नाही तो करून देणे हा त्यांच्या लिखाणाचा उद्देश आहे.पुस्तकाचा गुणविशेष म्हणजे लेखकाने चरित्र नायकांच्या प्रत्यक्ष घरी जाऊन त्यांच्याशी चर्चा आणि मुलाखती घेऊन माहिती मिळवली आहे. अनेक प्राथमिक कागदपत्रे त्यांनी याच्या लिखाणासाठी वापरलेली आहेत. प्रत्येक चरित्रनायकाचे थोडक्यात जीवन परिचय आणि त्यांचे संस्था वाटचालीतील महत्वाचे काय योगदान राहिले याचा आढावा ते प्रत्येक प्रकरणात घेताना दिसतात.[२ ३]

कर्मवीर भाऊराव पाटीलएक सम्यक आकलन लेखक यादव मा.के

हा एक मोठा आकलन ग्रंथ आहे ज्यात कर्मवीर चरित्र, रयत शिक्षण संस्थेची एकूण वाटचाल, जैनधर्म आणि भाऊराव, भाऊराव यांचे विविध क्षेत्रातील कार्य, रयत शिक्षण संस्थेची सन २०१६-१७ पर्यंतची वाटचाल थोडक्यात, त्यांचे कुटुंबीय अशी आपल्याला माहिती आपल्याला यातून मिळते. कर्मवीर यांच्या ऐतवडे गावाजवळ लेखकाचे गाव कार्वे हे गाव आहे. याचगावातील शाळेत ते नववीत आणि अकरावीत असताना त्यांची कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याशी भेट झाली. लेखक अकरावी उत्तीर्ण झाल्यावर झाल्यावर कर्मवीरांनी त्यांना संस्थेत बोलावून घेतले. लेखकांच्या मते तेव्हा कर्मवीरांनी त्यांच्या पुढील शिक्षणासाठी संस्थेचे एकूण २० रुपये खर्च केले होते. ही गोष्ट त्यांच्यासाठी लाखमोलाची आहे. कारण त्यांचा पुढील प्रवास प्राध्यापक ते प्राचार्य हा त्यामुळेच शक्य झाला. यामुळे कर्मवीर यांच्या वीस रुपयांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी त्यांना चरित्र लिहिण्याची इच्छा झाली. त्यांच्या मते कर्मवीर यांच्या अन्य लेखकांनी लिहिलेल्या चरित्रात काही घटना या चुकीच्या मांडल्या गेल्या आहेत. ज्या त्यांनी या पुस्तकात दुरुस्त केल्या आहेत. खरोखरीच इतकी विस्तृत माहिती देणारा ग्रंथ महत्वाचा ठरतो. कर्मवीर आणि रयत शिक्षण संस्थेची माहिती मिळविण्यासाठी. [२४]

रयत शिक्षण संस्थेचा एक व्हॉलंटरी शिक्षक शंकर यशवंत भागवत आठवणी लेखक शं.य.भागवत

पुस्तकाच्या शीर्षकावरून जाणवते की, लेखक यांनी रयत शिक्षण संस्थेत व्हॉलंटरी शिक्षक म्हणून सेवा बजावली आहेत. त्यांनी आलेल्या चांगल्या आणि वाईट प्रसंगाची आणि संघर्षाची कथा ते आपल्याला

सदर पुस्तकाच्या माध्यमातून सांगत आहेत. १९४५ ते १९५५ या कालावधीत रयत संस्थेत एकूण १० वर्ष लेखकानेव्हॉलंटरी शिक्षक म्हणून सेवा केली. यानंतर एकूण ३२ वर्ष रयतच्या विविध शाळांमध्ये सेवा केली. म्हणजे एकूण ४२ वर्ष एवढी प्रदीर्घ सेवा त्यांनी रयत शिक्षण संस्थेत केलेली आहे. व्हॉलंटरी शिक्षक यांच्या बद्दल कर्मवीर यांना अतिशय प्रेम होते. कारण दुर्गम ठिकाणी जीवन जगण्याचा मोठा संघर्ष करून ते विद्यादान करत होते. व्हॉलंटरी शिक्षक हा संस्थेचा पाया कर्मवीर मानत होते. या शिक्षकांनी केलेला त्याग समाजासमोर यावा हा हेतू लेखकाचा आहे. लेखक हे स्वतःचाच नाही तर एकप्रकारे आपल्यासमोर सर्व रयत मधील व्हॉलंटरी शिक्षक यांचे अनुभव आपल्यासमोर मांडत आहेत. शाळा भेटीच्या वेळेस कर्मवीर यांच्यासोबत आलेले अनुभव आपल्याला अन्य पुस्तकात न मिळालेली माहिती आपल्याला पुढे प्रस्तुत करतात. कर्मवीरयांच्याशी आलेला संबध आणि घटना आपल्याला नवीन माहिती कर्मवीर यांच्याबद्दल देतात हे ह्या पुस्तकाचे विशेष आहे. [२५]

**निष्कर्ष**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर लिहिण्यात आलेल्या चरित्र ग्रंथांची प्रचंड संख्या जर लक्षात घेतली तर भारतातीलच नव्हे जगातील बोटावर मोजण्याइतके महान लोक असतील की ज्यांच्यावर एकाच प्रकारात एवढ्या मोठ्या संख्येने ग्रंथनिर्मिती झाली असणार. इतक्या संख्येने त्यांच्यावरील चरित्रग्रंथ लिखाण झालेले असले तरी सर्वच चरित्र हे फार उठावदार आणि नाविन्यपूर्ण आहेत असे नाहीत. अनेकदा भाषाशैली आणि अन्य थोडाफार बदल जर सोडला तर यातले बहुतेक ग्रंथ हे एकमेकांची नक्कल वाटतात. यातल्या अनेक ग्रंथ हे कर्मवीर यांच्या प्रभावाने लिहिण्यात आल्याने विविध लेखकांनी नमूद केल्याप्रमाणे कर्मवीर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वा ऋणातून मोकळे होण्यासाठी लिहिण्यात आलेले आहेत. खर तर कर्माच्या क्षेत्रात तुम्ही कामातून कृतज्ञता व्यक्त करू शकतात विचाराच्या क्षेत्रात नाही.

मनुष्याला चांगले याबरोबर वाईट गुण दोषांची किनार देखील असते ही किनारच वरील भाबड्या भावनेने नष्ट होऊन जाते. वस्तुनिष्ठपणा हा आपण ज्याला देव मानले अथवा वडीलस्थानी मानले त्यांच्या बाबतीतले लिखाण करताना राहत नाही. म्हणून आधुनिक युगात कर्मवीर यांचे चरित्र लिहिण्यात आले असले तरी त्यात मध्ययुगीन भारतात सुलतान, बादशहा, राजा यांच्याबद्दल लिहिण्यात आलेल्या चरित्रग्रंथ अथवा बखरी यांच्यापेक्षा वरचा दर्जा प्राप्त होत नाही हे फार खेदाने म्हणावे लागते. खरेतर आधुनिक इतिहासाचे इतके विविध प्रवाह आणि वाद उपलब्ध असताना कर्मवीर यांच्यावर त्यांच्यावरील विविध पैलूंवर म्हणजे शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक व अन्य अशा प्रकारांवर इतिहास न लिहिणे ही फार मोठी उणीव आहे. त्यांच्यावरील चरित्रग्रंथांची प्रचंड संख्या एखाद्या कार्यकर्त्याला ऊर भरून येणारी गोष्ट वाटत असली तरी तीच फार मोठी चिंतेची आणि मर्यादेची गोष्ट आहे. हे येथे लक्षात घ्यावे लागेल.

कर्मवीर यांचा मोठा पत्रव्यवहार आणि आठवणी सांगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या रूपाने प्राथमिक साधने उपलब्ध असताना त्यांच्यावरील केवळ चरित्र हाच एक लोकप्रिय प्रकार हाताळला गेला ही खरी तर फार मोठी दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल. पुढच्या पिढ्यांना वारसा द्यावा म्हणून केवळ उत्तम असे दोन ते

तीन चरित्र ग्रंथ पुरे ठरले नसते का ? त्यांच्यावर लिखाण करणार्यांच्या यादीत आपले एक नाव वाढविण्यापेक्षा अन्य पैलूंवर प्रकाश टाकला असता तर इतिहासाची आणि साहित्य क्षेत्रात नवीन काहीतरी भर पडली असती. त्यांच्यावर चरित्र लिखाण करणे हे त्याच्या हयातीतच सुरु झाले होते ते त्यांच्या मृत्युनंतर साठ वर्ष पूर्ण झाले तरी सुरूच आहे.

संदर्भ

1. डॉ. मॅथ्यू ए.व्ही. (मराठी अनुवाद वाळिंबे वि.स.) कर्मवीर भाऊराव पाटील,प्रकाशक – रयत शिक्षण संस्था, सातारा प्रथम मराठी आवृत्ती- १९८८
2. बॅ.पाटील पी.जी.,कर्मविरोपनिषद अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी, प्रथमावृत्ती (दिनांक ३० जानेवारी १९६४) आणि तृतीयावृत्ती (९मे २००९) प्रकाशक – प्रा.एन.डी.पाटील, सातारा. सातारा. पान नं. १ ते ४२४
3. उपरोक्त, पान नं. १ ते ४२४
4. जमादार यू.बी., ज्ञानगंगा,प्रकाशक – राजाराणी प्रकाशन, मलवडी ता.माण प्रथमावृत्ती – ९ मे १९६९ पान नं. १ ते १२२
5. प्रा.मोरे अरविंद प्रतापराव ,कर्मवीर भाऊराव पाटील,सरस्वती प्रकाशन, कोल्हापूर प्रथम संस्करण- १५ अगस्त, १९८० पान नं.१ ते ९९
6. मोरे मारुती रामचंद्र, अग्निदिव्य जयश्री प्रकाशन, पलूस,सांगली, प्रथम आवृत्ती – १९७४ पान नं. १ ते ९०
7. सनदेसा.बा. "राही" पद्मभूषण (गीत-कर्मवीर) हिंदी खंडकाव्य पान नं. १ ते ६३
8. संपादक :- प्रा.नाईकवाडे अशोक, आधारवड कर्मवीर भाऊराव पाटील गौरवग्रंथ प्रकाशक – मनोहर दलाल, उस्मानपुरा, औरंगाबाद प्रथमावृत्ती – डिसेंबर १९८७ पान नं. १ ते २७५
9. डॉ.भोसले द.ता. कुमारांचे कर्मवीर प्रकाशन-रयत शिक्षण संस्था, सातारा सन-१९८७ पान नं. १ ते १८७
10. पाटणे संभाजीराव, त्यागमूर्ती कर्मवीर भाऊराव, सुशील प्रकाशन,सातारा, प्रथम आवृत्ती – २२ सप्टेंबर १९८२ पान नं. १ ते ५०
11. प्रा.मोरे अरविंद, शिक्षणमहर्षी कर्मवीर-गाथा (कथासंग्रह) एकच ध्यास : स्वावलंबी शिक्षणाचा सरस्वती प्रकाशन, पनवेल प्रथम संस्करण – २२ सप्टेंबर १९८८ पान नं. १ ते ५६
12. प्रा.मोरे अरविंद, ज्ञानभगीरथ कर्मवीरवाणी, सरस्वती प्रकाशन, पनवेल प्रथम संस्करण – ९ मे,१९८९ पान नं. १ ते ५४
13. तोडरमल ह.कि. ,कर्मवीर पाटील चरित्र व कार्य, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०, प्रथमावृत्ती १९८७ १९८७ (कर्मवीर भाऊराव पाटील जन्मशताब्दी वर्ष) पान नं. १ ते १७७

14. खोले वसुंधरा , भावसुमनांजली, मयुरेश प्रकाशन, पनवेल,रायगड प्रथम आवृत्ती – ९ मे १९८९ पान नं. १ ते ६४
15. काटकर मा.भि. , प्रबोधनाची धगधगती मशाल कर्मवीर भाऊराव पाटील प्रकाशक – घाटे व्ही.के.सचिव कर्मवीर विद्याप्रबोधिनी रयत शिक्षण संस्था,सातारा आवृत्ती सप्टेंबर - १९८९ पान नं. पान नं. १ ते २०४
16. पाटील भगवान ,कर्मवीरगाथा, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती- डिसेंबर १९९५ पान नं. १ ते ते १३७
17. .डॉ.पाटील विमला प्रा.डॉ.पाटील शिवाजी ,वटवृक्ष, प्रा चंद्रकिरण प्रकाशन,सातारा प्रथम आवृत्ती – –९ मे १९९६ पान नं. १ ते १०२
18. पाटील अजित, माणसातील देव प्रकाशक – सौ.सुनंदा पाटील, सातारा प्रथमावृत्ती – २००४ पाने पान नं. १ ते ११७
19. कर्मवीर गीतमाला काव्यरचना – श्री मेरेकर अविनाश कृष्णराव प्रकाशक – सौ.अपर्णा मेरेकर, पनवेल आवृत्ती प्रथम – नोव्हे.२००५ पान नं. १ ते ६२
20. प्रा.डॉ.जाधव मोहन ,महान शिक्षविद्‌कर्मवीर भाऊराव पाटील (जीवनगाथा) ,अन्नपूर्णा प्रकाशन,कानपूर प्रकाशन वर्ष – २००७ पान नं. १ ते १२०
21. प्रा.मगदूम विष्णुदास एच. , द्रष्टा महात्मा भाऊराव पाटील प्रकाशक –चेअरमन, हरिश्चंद्र-रुक्मिणी रुक्मिणी धर्मादाय संस्था लि.,केनवडे प्रथमावृत्ती-२०१५ पान नं. १ ते १९९
22. श्री.पाटोळे अरविंद ,संस्कारक्षम चरित्र मालिका कर्मवीर भाऊराव पाटील प्रकाशक –आदर्श विद्यार्थी विद्यार्थी प्रकाशन,पुणे आवृत्ती – २०१८ पान नं. १ ते ३२
23. रयत शिक्षण संस्थेतील प्रारंभीचे शिलेदार रयत शिलेदार प्राचार्य डॉ.नलावडे विजयराव प्रथम आवृत्ती २०१४ पान नं. १ ते ३२८
24. यादव मा. के, कर्मवीर भाऊराव पाटीलएक सम्यक आकलन गिरीजा केदारप्रकाशन, सैदापूर, सातारा प्रथमआवृत्ती ९ मे २०१७ पान नं. १ ते ४४८
25. भागवत शंकर यशवंत, रयत शिक्षण संस्थेचा एक व्हॉलंटरी शिक्षक आठवणी,यशवंत प्रकाशन, सातारा प्रथम आवृत्ती – १९९४ पान नं. १ ते १७६